रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

## जागतिक महिला दिन विशेष 2025-2026

## दिनांक-09.03.2026

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयांमध्ये 11 मार्च 2026 रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात येणार आहे तरी सर्व प्राध्यापकांनी आपल्याला नेमून दिलेल्या गावी जाऊन तिथल्या स्वच्छता कर्मचारी ,आशा सेविका , बचत गट, लोकप्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याविषयी निमंत्रित करावे. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,



उंब्रज, ता. कराड, जि. सातारा

# जागतिक महिला दिन विशेष

"सेवेचा वसा कर्तृत्वाचा ठसा ,नवे पाऊल नवी दिशा:उजळू दे प्रगतीची आशा"

(स्वच्छता दूत. आरोग्यदूत बचत गट आणि लोकप्रातिनिधीच्या कर्तृत्वाचा गौरव सोहळा २०२६ )

प्रमुख मार्गदर्शक :मा. ॲड. प्राजक्ता कुलकर्णी

(दिवाणी आणि फौजदारी न्यायालय, कराड )

कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्राचार्य डॉ. एस. एम. गावडे

प्रमुख उपस्थिती : प्रा. मनोहर माळगे

मा. प्रकाश चव्हाण

मा. जयंतराव जाधव

बुधवार, दि. ११ मार्च, २०२६ स्थळ : मुख्य सभागृह, दूसरा मजला वेळ: सकाळी ९ .३० वा

रयत शिक्षण संस्थेचे,

## सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

## अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती, स्वयंसिद्धा यांच्या संयुक्त विद्यमाने

**'जागतिक महिला दिन विशेष'**

" सेवेचा वसा कर्तृत्वाचा ठसा, नवे पाऊल नवी दिशा: उजळू दे प्रगतीची आशा"

(स्वच्छता दूत,आरोग्यदूत आणि लोकप्रतिनिधींच्या कर्तृत्वाचा गौरव सोहळा २०२६)

**प्रमुख पाहुणे**

**मा.ॲड. प्राजक्ता कुलकर्णी ( दिवाणी व फौजदारी न्यायालय, कराड)**

**प्रमुख उपस्थिती**

**मा.प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे (एस. जी. एम. कॉलेज, कराड)**

**अध्यक्ष**

मा.प्र.प्राचार्य डॉ. संभाजी गावडे

बुधवार दिनांक ११ मार्च २०२६

वेळ सकाळी १०.०० वाजता

**स्थळ:** सभागृह

अहवाल

दिनांक.11 मार्च,2026

रयत शिक्षण संस्थेच्या सौ मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालय परिसरातील 42 गावातील विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण समिती व स्वयं सिद्धा सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमांमध्ये स्वच्छता कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी मदतनीस, बचत गट प्रमुख व सदस्य, ग्रामपंचायत मधील सरपंच व सदस्य या लोकप्रतिनिधींचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून अ‍ॅड.प्राजक्ता कुलकर्णी (दिवाणी व फौजदारी न्यायालय कराड) उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संभाजी गावडे होते महाविद्यालय विकास समिती सदस्य मा.जयंतराव माधव मा. दिनेश कदम मा. प्रल्हाद जाधव मा. तानाजी कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. अ‍ॅड. प्राजक्ता कुलकर्णी यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणात महिलांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या विविध कायद्याची माहिती देत महिला सक्षमीकरणाचा मुद्दा प्रभावीपणे मांडला त्या म्हणाल्या ,महिलांच्या संरक्षणासाठी केंद्र शासनाने विविध कायदे केले आहे. शालेय जीवनापासून महिलांना सुरक्षित सन्मान ने जगता यावे यासाठी काहीतरी काम करने गरजेचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. उपप्राचार्य प्रा. मनोहर नाडे यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयाचा शैक्षणिक परपरेचा आणि विद्यार्थी घडवण्याच्या योगदानाचा आढावा घेतला.अध्यक्षीय भाषणात डॉ.संभाजी गावडे यांनी महिलांच्या प्रगतीचे महत्त्व सांगितले ते म्हणाले,आज भारतात महिला पुरुषांच्या बरोबरीने अनेक क्षेत्रात काम करताना दिसत आहेत सामाजिक स्थैर्य आणि समाजात आर्थिक प्रगती साधायची असेल तर शिक्षण घेणे गरजेचे आहे. मा. जयंतराव जाधव मा.तानाजी कदम यांनी महिलांना शुभेच्छा दिल्या.शिरगावच्या सरपंच मनीषा राजेंद्र यादव यांनी मनोगत व्यक्त केले आणि सन्मान सोहळ्याची गरज प्रेरणा देण्यासाठी गरजेचे असल्याचे सांगितले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मंदाकिनी वर्णेकर यांनी केले .सूत्रसंचालन प्रा. शुभांगी लाड यांनी केले तर आभार प्रा.डॉ. विजया पाटील यांनी मानले उंब्रज पंचक्रोशी तील समाजसेवे मध्ये मोलाची भूमिका बजावणाऱ्या महिलांचा हा सन्मान सोहळा गौरवाचाच नव्हे तर महिला सक्षमीकरणाचा आणि सामाजिक बांधिलकीचा आहे असा प्रभावी संदेश या कार्यक्रमावर द्वारे दिला गेला.

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

# Main Edition / 13 Mar 26

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

# उंब्रज महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्ताने पंचक्रोशीतील महिलांचा सन्मान सोहळा

◆ महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

**उंब्रज, दि. १२ मार्च :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालया मध्ये ०८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्ताने महाविद्यालयातील अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती व स्वयंसिद्धा सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने ११ मार्च रोजी पंचक्रोशीतील स्वच्छता दूत, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशावर्कर, आरोग्य दूत, बचत गट, आणि महिला लोकप्रतिनिधींचा सन्मान सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती, जयंतराव जाधव, दिनेश कदम, प्रल्हाद जाधव, तानाजी कदम महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मनोहर माळी इ. ची उपस्थिती लाभली.

प्रमुख पाहुण्या एडवोकेट प्राजक्ता कुलकर्णी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, या महाविद्यालयाने महिलांचा विशेष सन्मान सोहळा कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल सर्वांचे वतीने धन्यवाद. पुढे त्या म्हणाल्या,महिलांच्या संरक्षणासाठी केंद्र शासनाने विविध कायदे केलेले आहेत. शालेय जीवनापासून ते विवाहोत्तर जीवनापर्यंत महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने जगता यावे, यासाठी हे कायदे संरक्षण कवच म्हणून कार्य करतात. कायदे समाजात न्याय आणि समतोल राखण्यासाठी असतात. त्यामुळे महिलांनी आपल्या हक्कांची जाणीव ठेवत जबाबदारीने त्यांचा उपयोग करणे आवश्यक आहे.

०८ मार्च हा दिवस जगभरात जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो.यादिनानिमित्ताने महिलांना समाजात सन्मानाने गौरविण्याची परंपरा वाढत आहे.



अनेक ठिकाणी महिलांचा सन्मान केला जातो, त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. महिलांनी आपल्या हक्कांविषयी सजग राहणे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आवश्यक आहे. आज येथे जमलेल्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, स्वच्छता दूत, महिला लोकप्रतिनिधी, आशा वर्कर, तसेच महिला बचत गट चालवणाऱ्या प्रमुख यांचा सन्मान होत आहे. समाजाच्या जडणघडणीत या सर्व महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे अशा प्रकारचे सन्मान सोहळे समाजात अनेक ठिकाणी आयोजित व्हायला हवेत.

समाजामध्ये पुरुषांनी महिलांना बरोबरीचा मान दिला, त्यांचा सन्मान राखला, तर महिलांनाही आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा मिळते. समाजसेवेच्या भावनेतून समाज अधिक सुदृढ आणि प्रगत होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात जयंतराव जाधव व तानाजी कदम यांनी उपस्थित सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या. तसेच उपस्थित महिलांच्या वतीने शिरगाव गावच्या सरपंच मनिषा राजेंद्र यादव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक मनोहर माळी यांनी आपले मनोगत व्यक्त केले महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मनोहर माळी यांनी उपस्थित सर्व महिला भगिनींना महिला दिन कार्यक्रमाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. या महाविद्यालयामध्ये १९८९ पासून अनेक विद्यार्थिनी शिक्षण घेऊन बाहेर पडल्या आहेत. त्यापैकी बऱ्याचशा विद्यार्थिनी प्राध्यापिका, शिक्षिका, महाराष्ट्र पोलीस, वनाधिकारी, फायर ब्रिगेड व नोकरी करीत आहेत. अनेक विद्यार्थ्यांच्या पिढ्या या महाविद्यालयाने घडविलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महाविद्यालयामध्ये विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाबरोबरच विविध शॉर्टटर्म कोर्स राबविले आहेत. यामध्ये टेली, फॅशन डिझायनिंग, शिवणकला, ब्युटी -पार्लर, बालवाडी,इंग्लिश कम्युनिकेशन असे विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देणारे लघु कालावधीचे कोर्स राबविले जात आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी गावडे म्हणाले, आज भारतामध्ये पुरुषांच्या बरोबरीने अनेक क्षेत्रात महिला काम करताना दिसत आहेत.उंब्रज पंचक्रोशीतील स्वच्छता दूत, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशावर्कर, आरोग्य दूत, बचत गट, आणि महिला लोकप्रतिनिधी यांचा सन्मान सोहळा होत आहे . आम्हाला मोठा आनंद होत आहे. समाजामध्ये प्रत्यक्ष पुरुषांच्या बरोबरीने आर्थिक, सामाजिक, स्थैर्य घेण्यासाठी व स्वावलंबनासाठी विद्यार्थिनींनी चांगले शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थिनींनी चांगले शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आजच्या महिलादिनी संकल्प करावा असा संदेश दिला.

या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील एकूण २०० हून अधिक महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका मंदाकिनी वर्णेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुभांगी लाड यांनी केले आभार प्रा. डॉ. विजय पाटील यांनी मानले.


GPS Map Camera
Umbraj, Maharashtra, India
C32x+29h, Umbraj, Maharashtra 415109, India
Lat 17.400218° Long 74.098036°
Wednesday, 11/03/2026 12:28 PM GMT +05:30
Google




GPS Map Camera
Umbraj, Maharashtra, India
C32x+29h, Umbraj, Maharashtra 415109, India
Lat 17.400401° Long 74.098116°
Wednesday, 11/03/2026 12:44 PM GMT +05:30
Google


रयत शिक्षण संस्थेचे,
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा
शताब्दी महोत्सव
Samsung Quad Camera
Shot with my Galaxy
M51$$GIRI$$




रयत शिक्षण संस्थेचे,
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा
शताब्दी महोत्सव
Samsung Quad Camera
Shot with my Galaxy
M51$$GIRI$$


दिन विशेष
श्री. जयंतराव जाधव
मा. प्र. प्राचार्य, डॉ. संभाजी गावडे
मा.ॲड. प्राजक्ता कुलकर्णी
मा. प्रा. मंदाकिनी वर्णेकर
मा. डॉ